**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १०७७/२०२५ मधील आदेश**

(CNR NO. MHPU090096422025)

**सतीश शेरखाने वि. कृष्णा राजीवाडे व इतर**

(पारीत दि.२७.११.२०२५)

सदरचा अर्ज हा अर्जदाराने दाखल केला असुन अर्जदाराने अर्जात असे कथन केले आहे की, आरोपी व तपासी अधिकारी यांचे संगनमत असुन तपास अधिकारी हे सदर गुन्हयाच्या तपास योग्य पध्दतीने करत नाहीत. आरोपी व पिडिता ज्या दिवशी जात होते त्यादिवशीचे सीसीटिव्ही फुटेजचे छायाचित्र जाणीवपुर्वक आरोपीला मदत होण्यासाठी काढुन टाकले असल्याचे समजते. तपासिक अधिकारी यांनी त्याबाबत कोणतीही चौकशी केली नाही. सदर आरोपीला चौकशीसाठी पोलिस स्टेशनला बोलाविले असता त्याला ३ ते ४ तास पोलिस स्टेशनला बसवुन ठेवले व त्यानंतर त्याला सोडुन दिले. तेव्हापासुन सदर आरोपी हा फरार आहे. त्याचे कारण तपासी अधिकारी देवु शकत नाहीत. दि. ०२/११/२०२५ रोजी अर्जदारांनी पिडितेला आणि आरोपील पुनावले येथे पाहिले असल्याची बाब कळविली असता तपासिक अधिकारी त्याची कोणतीही दखल घेतली नाही. यावरुन सदर आरोपीला मदत व्हावी म्हणुन तपासीक अधिकारी त्या अनुषंगाने तपास करीत आहेत असे दिसुन येते. पिडितेचे वय पाहता ती अज्ञान आहे. सदर पिडितेला काही झाल्यास तपासी अधिकारी हे जबाबदार राहितील. या सर्व परिस्थितीत सदर गुन्हयाचा तपास हा पोलिस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेकडुन होणे गरजेचे आहे. अर्जदारांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज मंजूर करावा व सदर गुन्हयाचा तपास हा पोलिस आयुक्त, पिंपरी चिंचवड पुणे यांचेमार्फत व्हावा. याशिवाय, आरोपीविरुध्द बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम कलम ८ व १२ प्रमाणे गुन्हा दाखल व्हावा असा ही आदेश करण्यात यावा, या गुन्हयाचा तपास दोन दिवसात पुर्ण त्याचा अहवाल कोर्टात दाखल करावा अशी विनंती अर्जदारांनी अर्जात केली आहे.

२. सदर अर्जावर पिडितेचे आईवडिल यांना ऐकले. अर्जदारांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. तपासिक अंमलदार यांनाही ऐकले. सदर अर्जातील तपासिक अंमलदार यांचेविरुध्द केलेले आरोंपाबद्दल अर्जदार यांनी पुर्वी पोलिस निरीक्षक चिंचवड पोलिस स्टेशन, पुणे यांना दि. २०/१०/२०२५ रोजी, पोलिस आयुक्त पिंपरी चिंचवड, पुणे यांना दि. ०३/११/२०२५ रोजी लेखी स्वरुपात कळविलेले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य पोलिस

आयुक्त यांनाही ईमेलद्वारे सदर गुन्हयाच्या तपासाबाबत कळविलेले आहे. सदरचे तिन्ही लेखी पत्र व्यवहार अर्जदारांनी सदर अर्जासोबत दाखल केले आहे. यावरुन सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्याकरिता अर्जदार यांनी संबंधित पोलिस विभागाच्या वरिष्ठांना कळविले असल्यामुळे सदर अर्जावर कोणताही आदेश पारित करणे योग्य ठरत नाही. त्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१. अर्ज निकाली काढण्यात येतो.

२. पोलिस अधिक्षक, पिंपरी चिंचवड, पुणे यांचेकडे अर्जदारांनी दिलेल्या अर्जाची छायांकित प्रत पाठविण्यत येत आहे.

३. पोलिस अधिक्षक, पिंपरी चिंचवड, पुणे यांना सदर अर्जाच्या अनुषंगाने लेखी पत्र पाठविण्यात यावा.

AUTI GAURI GHANASHAM Digitally signed by AUTI GAURI GHANASHAM Date: 2025.11.28 15:42:54 +0530

पिंपरी, पुणे. (जी. जी. औटी)

दिनांक : २७.११.२०२५ **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**(कोर्ट नं.६) पिंपरी, पुणे.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are the same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | B. S. Jamkhandi[Steno III] |
| Name of the Court | :- | G. G. Auti<br>$6^{th}$ Jt. J.M.F.C. & C.J.J.D Pimpri Pune. |
| Date | :- | 27.11.2025 |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 27.11.2025 |
| Order uploaded on | :- | 28.11.2025 |